## उपक्रम – वयोगट १६ – १८ / प्रौढ

उपक्रमा मध्ये सहभागाबद्दल धन्यवाद. वयोगट १६ – १८ / प्रौढ उपक्रमा बद्दल खालील माहीती आहे.

## शिक्षणाचे महत्व

शिक्षणाशिवाय रेबिजमुळे होणारी जीवितहानी थांबविणे अशक्य आहे. लहान मुलांना रेबिज विषयी माहिती देवून, व तो कसा टाळता येईल आपल्याला हे उद्दिष्ट साध्य करता येईल. मुलांच्या शिक्षणातून आपण त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचू शकतो. ज्या मुलांनी या उपक्रमात सहभाग घेतला आहे त्यांच्या घरापर्यंत आपली माहिती पोहचू शकते. तसेच प्रौढ ही आपल्या घरी जाऊन मुलांना माहीती देतील.

## शैक्षणिक उपक्रमाचे फायदे

या उपक्रमामुळे मुलांना खालील गोष्टींची माहिती मिळते.

- रेबिचा परिणाम
- रेबिज कसा टाळता येईल
- श्वानदंश कसा टाळता येईल.
- रेबिज कसा नाहीसा करता येईल.
- रेबिलग्रस्त कुत्रा (श्वान) कसा ओळखावा.

## शिक्षण प्राप्त झाल्याचा पुरावा ?

उपक्रमा मध्ये – उपक्रमा पुर्वी व नंतर तपासणीची सोय आहे. तोंडी प्रश्न व प्रश्नमंजुशा या मार्फत ही तपासणी करता येते. माहिती देण्याआधी व दिल्यानंतर मुलांची उत्तरे देण्याची कुवत नोंद करा.

मागावून करावयाच्या कार्यवाईत – दिलेली माहीती लक्षात ठेवायची मुलांची कुवत तपासून पहा. दिर्घकाळामध्ये, श्वान दंशाच्या संख्येमध्ये झालेली घट व कुत्र्यांच्या लसिकरणामध्ये झालेली वाढ यावरुन शिक्षण प्राप्त होईल.

## उपक्रमाचा मतीत अर्थ

सहभागी व्यक्तींना रेबिज विषयी, त्याच्या प्रतिबंधाविषयी अधिक माहीती मिळावी व भूमिका साकार करता याव्यात अशी या उपक्रमाची मांडणी आहे. आपल्या घरी व सभोवताली घ्यावयाच्या जबाबदारीची जाणीव या उपक्रमा मध्ये अधीक माहीती द्वारे करुन दिली आहे. शहरी भागातील उदाहरण देऊन ही समस्या आपल्याला भेडसावू शकते हे यामध्ये अधिक महत्व देऊन मांडले आहे. उपक्रमामुळे मुलांमध्ये कुत्र्यांविषयी असुया किंवा भिती निर्माण होऊ नये – यासाठी – कुत्रे जरी घातक असले तरी ते चांगले पाळीव प्राणी होऊ शकतात याची काळजी पुर्वक माहीती दया.

**उपक्रमाचे साहित्य –**

- कॉम्प्युटर व स्क्रिनची सोय असलेला वर्ग
- पावरपॉइंट प्रेझेंनटशन
- कागद व पेन (पाठपुराव्यासाठीच्या उपक्रमाकरिता).